**International Journal of Advance and Applied Research**
**www.ijaar.co.in**
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 11 No. 3** **Jan-Feb 2024**

# महाराष्ट्रातील दिव्यांगांचे उच्च शिक्षण आणि सर्वंकष सबलीकरणातील समस्या व उपाययोजना

**डॉ. कीर्तीकर वाल्मीक भीमराव**
सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग प्रमुख, छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय सोलापूर
**Corresponding Author – डॉ. कीर्तीकर वाल्मीक भीमराव**
**Email:** kirtikarwalmik@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14614198**

**प्रस्तावना**

कोणत्याही देशाच्या समाजातील सर्व समाज घटकांमध्ये समानता निर्माण करण्यासाठी व त्यांना सामाजिक न्याय उपलब्ध करून देण्यासाठी सर्वात महत्त्वाची भूमिका त्या देशाच्या शिक्षण व्यवस्थेची असते. म्हणून कोणत्याही पूर्वग्रहीत अटीशिवाय सर्वसमावेशक व न्याय समाजाच्या निर्मितीसाठी सर्व समावेशक शिक्षण व्यवस्थेची गरज असते जेणेकरून राष्ट्राच्या प्रगतीमध्ये सर्व समाज घटकांना हातभार लावण्याची संधी मिळेल व सर्वसमावेशक सामाजिक विकासाचे वातावरण निर्माण होईल.

भारतीय शिक्षण व्यवस्थेत वेळोवेळी आखलेल्या सरकारी धोरणांनी शालेय शिक्षणाचा सर्व स्तरांमधील लिंग आधारित, सामाजिक श्रेणीतील अंतर तसेच शारीरिक दृष्ट्या, मानसिकदृष्ट्या अपंगत्वामुळे शिक्षणाच्या दृष्टीने निर्माण झालेले अंतर दूर करण्याच्या दृष्टीने स्थिर प्रगती केली असली तरीही शिक्षणाच्या बाबतीत ऐतिहासिक दृष्ट्याउपेक्षित, सामाजिक आर्थिकदृष्ट्या वंचित गटांमध्ये अजूनही मोठी असमानता आहे. म्हणून संशोधकाने महाराष्ट्रातील दिव्यांगांच्या प्राथमिक व उच्च शिक्षणातील सद्यस्थिती कशा प्रकारची आहे हे जाणून घेण्यासाठी सदरील संशोधन कार्य हाती घेतले आहे.

ब्रिटिश काळातच भारतात दिव्यांगांच्या शिक्षणाची सुरुवात झाली. पुढे स्वातंत्र्योत्तर भारतात 1952 मध्ये मुदलियार आयोगाने सर्व प्रकारच्या दिव्यांगांना प्रवर्गनिहाय विशेष शाळांमधून शिक्षण देण्याची शिफारस केली होती. कोठारी आयोगानेही दिव्यांगांच्या समावेशित शिक्षणाचे समर्थन केले. 1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील एकात्म शिक्षणातून दिव्यांग सबलीकरणाचा अयशस्वी प्रयत्न झाला याशिवाय भारतीय पुनर्वास परिषदेच्या स्थापनेनंतरही दिव्यांगांच्या उच्च शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले व अलीकडील काळात भारत सरकारने पारित केलेला 'दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम- 2016' यातील दिव्यांगांच्या उच्च शिक्षणासाठीच्या तसेच प्राथमिक, माध्यमिक शिक्षणासाठीच्या आणि त्यांच्या सर्वंकष सबोलीकरणासाठीच्या तरतुदी व अंमलबजावणीविषयीची सरकारची भूमिका ही दिव्यांगांच्या सर्वंकष सबलीकरणासाठी अपूर्ण असल्याचे दिसते.

---

**उद्दिष्टे**

1) दिव्यांगांची उच्च शिक्षणातील सद्यस्थिती अभ्यासणे.

2) महाराष्ट्रातील दिव्यांगांच्या सर्वंकष सबलीकरणातील समस्येचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचविणे.

**गृहीतके**

1) दिव्यांगांच्या शालेय शिक्षणात प्रवर्गनिहाय व क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम, पाठ्यक्रम व स्वतंत्र शिक्षण व्यवस्थेचा अभाव आहे. तसेच ग्रामीण व शहरी दिव्यांगांच्या बाबतीत शासकीय पातळीवर धोरणात्मक निर्णयाचा कृती कार्यक्रमाचा अभाव आहे तसेच उपलब्ध योजना सोयी-सुविधांची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांच्या दिव्यांग विषयीचा दृष्टिकोन नकारात्मक असल्याने प्राथमिक माध्यमिक व उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे.

2) महाविद्यालयातील उच्चशिक्षण घेणाऱ्या शहरी व ग्रामीण भागातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्यात एकही स्वतंत्र शासकीय व खाजगी महाविद्यालय व निवासासाठी स्वतंत्र वस्तीग्रह नाही तसेच समाज कल्याणच्या अनुसूचित जाती- जमातीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या वस्तीगृहात दिव्यांग विद्यार्थ्यांनात 3 टक्के जागा राखीव ठेवून प्रवेश देण्याची

व्यवस्था आहे परंतु ती संख्या अपूर्ण असल्याने व रोजगारभिमुख शिक्षणाची सोय नसल्याने उच्च शिक्षणातील दिव्यंगांचे प्रमाण सद्यस्थितीत महाराष्ट्रात 0.25% पर्यंत सीमित असल्याचे एका सर्वेक्षणात दिसून येते. उच्च शिक्षणातील हे अल्प सहभागाचे प्रमाण सधन कौटुंबिक पार्श्वभूमी असणाऱ्या विद्यार्थ्यांचेच असल्याचे दिसते.

**महाराष्ट्रातील दिव्यांगांची प्राथमिक शिक्षणातील सद्यस्थिती**

भारतातील इतर सामाजिक - आर्थिक दृष्ट्या वंचित असलेल्या घटकांपेक्षाही वंचित घटक म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते तो दिव्यांग समाज घटक होय. स्वातंत्र्योत्तर भारतात दिव्यांगांच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाकडे शासकीय पातळीवर तसेच सामाजिक दृष्टिकोनातून अन्याय झाल्याचे दिसते. इयत्ता पहिली ते चौथी पर्यंत दिव्यांगांना शिक्षण घेताना खूप अडचणींना सामोरे जावे लागते. इयत्ता चौथी उत्तीर्ण झाल्यानंतर दिव्यांगांना विशेष शिक्षकाची आवश्यकता असते जे त्यांच्या क्षमतेनुसार उपलब्ध होत नाही. कोणत्याही खाजगी व शासकीय शिक्षण संस्थेमध्ये अंध, मतिमंद, मूकबधिर यांना शिक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून पाचवीपासून दहावीपर्यंत सलग शिक्षण दिले जात नाही ती शासकीय शाळा, कर्मशाळा असो की खाजगी व्यवस्थापनाची शाळा कर्मशाळा असो त्या ठिकाणी दिव्यांगांना आवश्यक असलेल्या सर्व शैक्षणिक सुविधा निर्माण झालेल्या दिसून येत नाही त्यामुळे महाराष्ट्रात दिव्यांगांना शिक्षण पूर्ण करता येणे हे एक दिवा स्वप्नच आहे.

U-DISE 2016-17 च्या उपलब्ध माहितीनुसार प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांपैकी सुमारे 19.6% विद्यार्थी अनुसूचित जातीतील असतात पण ही संख्या उच्च माध्यमिक स्तरावर 17.3% इतकी घसरते. शाळेतील ही गळती अनुसूचित जाती जमातीमध्ये 10.6% वरून 6.8% आणि दिव्यांग मुलांमध्ये 1.1% वरून ते 0.25% पर्यंत जास्त गंभीर आहे. यापैकी प्रत्येक गटात विद्यार्थिनीची गळती जास्त आहे. उच्च शिक्षणातील नोंदणीमधील घट यापेक्षाही जास्त आहे.

नवीन शैक्षणिक धोरण- 2020 मधील तरतुदीनुसार विशेष गरजा असणाऱ्या किंवा दिव्यांग मुलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांना इतर कोणत्याही मुलांप्रमाणे दर्जेदार शिक्षण मिळवण्यासाठी समान संधी पुरवणारी यंत्रणा तयार करण्याचे महत्त्व सुद्धा या धोरणामध्ये मान्य केले आहे परंतु समान संधी पुरवणाऱ्या कोणत्या यंत्रणा असतील, त्यांची कार्यपद्धती काय असेल, त्यासाठी निधीची काय तरतूद असेल याबाबतचे धोरण अस्पष्ट आहे.

दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा - 2016 मध्ये सर्वसमावेशक शिक्षणाची व्याख्या अशी केली आहे की 'शिक्षणाची अशी प्रणाली की जिथे अपंगत्व असलेले आणि नसलेले एकत्रितपणे शिकतात आणि अध्यापन आणि अध्ययनाची पद्धत वेगवेगळया प्रकारच्या अपंग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गरजांचा विचार करून योग्यरित्या बदललेली असते'. ECCE आणि शालेय शिक्षण प्रणालीत दिव्यांग मुलांचा समावेश आणि समान सहभाग सुनिश्चित करण्याला सुद्धा सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल असे नमूद करण्यात आले आहे. याशिवाय दिव्यांग विद्यार्थ्यांना पायाभूत स्तरापासून उच्च शिक्षणापर्यंत सामान्य शालेय प्रक्रियेत पूर्णपणे सहभागी होता येईल यासाठी त्यांना सक्षम केले जाईल अशी ही तरतूद आहे परंतु हे सर्व करत असतात असताना दिव्यांग मुले कोणत्या सामाजिक, सांस्कृतिक परिवेशातून शालेय परिसरात प्रवेश करतात त्यांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक पार्श्वभूमी कशा प्रकारची असते आणि त्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या लागणार आहे याबाबतची सरकारची भूमिका अस्पष्ट आहे.

**राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मधील दिव्यांगाच्या प्राथमिक शिक्षणासंबंधीच्या तरतुदी आणि वास्तव**

शालेय प्रणालीत दिव्यांग मुलांचा समावेश आणि समान सहभाग हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि अपंग विद्यार्थ्यांचे एकात्मिकरण करण्यासाठी संसाधने पुरविले जातील आवश्यकता असेल तिथे गंभीर किंवा अनेक अपंगती असलेल्या मुलांसाठी विविध अपंगत्वाशी संबंधित प्रशिक्षण घेतलेल्या खास शिक्षकांची भरती केली जाईल सर्व प्रकारच्या दिव्यांग मुलांना कोणत्याही अडथळे विना शाळेत प्रवेश करता येईल अशी व्यवस्था केली जाईल वेगवेगळया श्रेणीतील सर्व मुलांच्या गरजा भागविण्यासाठी रहिवासी सुविधा आणि त्यांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी व त्यांचा संपूर्ण सहभाग आणि समावेश सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक यंत्रणा तयार करण्यासाठी शाळा आणि शालेय संकुलन काम करतील आणि त्यासाठी त्यांना शासनाकडून मदत केली जाईल सहाय्यक डिव्हायसेस आणि तंत्रज्ञानावर आधारित योग्य टूल्स तसेच पुरेशी आणि भाषिक दृष्ट्या

योग्य अध्ययन अध्यापन पद्धती उपलब्ध करून दिल्या जातील

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संपूर्ण सहभाग व समान संधी हे उद्दिष्ट असते तरी संपूर्ण सहभागाची स्पष्ट व्याख्या करण्यात आलेली नाही तसेच अपंगत्वाचे वर्गवारीनुसार उपाययोजना सुचविलेल्या नाहीत एक गोष्ट मात्र खरी आहे की दिव्यांगण सरकारी आस्थापनामध्ये कार्यालयामध्ये शाळा महाविद्यालयामध्ये बस स्थानके रेल्वे स्टेशन अशा सार्वजनिक ठिकाणी अडथळावरहीत वातावरण निर्माण करण्यासाठी रॅम व सरकते जिने निर्माण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे परंतु त्यांचे सार्वजनिक जीवन सुखकर होईल व शैक्षणिक आर्थिक सामाजिक विकासास हातभार लागेल अशा स्पष्ट तरतुदी स्वातंत्र्योत्तर काळातील शैक्षणिक धोरणात असलेल्या दिसून येत नाहीत ज्या तरतुदी आहेत त्याची पारदर्शकपणे अंमलबजावणी होताना दिसून येत नाही.

बहुतांश राज्य सरकारांनी दिव्यांग शाळा व कर्मशाळा खाजगी संस्थांना राज्यात सुरू करण्याची परवानगी देताना त्याचे निकष मात्र पडले नाहीत त्याबाबत बृहद आराखडा मंजूर करण्यात आला नाही त्यामुळे काही जिल्ह्यात 60-70 शाळा आहेत तर काही जिल्ह्यात तीन-चार शाळा काही जिल्ह्यात खूपच जास्त आहेत तर काही जिल्ह्यात एक दोन पण शाळा नाहीत म्हणजेच योग्य कृती आराखडा तयार न करता त्याकडे दुर्लक्ष झाली आहे.

याशिवाय दिव्यांगांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर आहे सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या न्यायाधीश जयस वर्मा आयोगाच्या 2012 मते 10000 पेक्षा जास्त संख्या असलेल्या स्वतंत्र टी ई आय एस पैकी बहुतेक सर्व गंभीरपणे शिक्षकांच्या शिक्षणाचा प्रयत्न सुद्धा करीत नाही तर पैसे घेऊन पदव्या विकत आहे ही बाब दिव्यांगाच्या शिक्षण प्रशिक्षण संस्था ला सुद्धा लागू पडते दिव्यांगांना शिकविणारे शिक्षक ज्या शिक्षण प्रशिक्षण संस्थेतून प्रशिक्षण घेतात त्या प्रशिक्षण संस्था बहुतांशी विनाअनुदानित किंवा कायम विनंती तत्त्वावर असल्याने तिथे पायाभूत सुविधांची कमतरता असल्याने दर्जेदार शिक्षक प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नाहीत शिक्षण प्रशिक्षण संस्था चालविणारी खाजगी संस्थाचालक यांचा दृष्टिकोन फक्त नफेखोरी हा असल्याने सेवाभावी वृत्ती कमी होत चाललेली आहे पर्यायाने विद्यार्थ्यांच्या गरजा नुसार प्राथमिक शिक्षण त्यांना मिळत नाही त्यामुळे दिव्यांग शिक्षक शिक्षण शिक्षणात शिक्षण क्षेत्राची मानदंड उंचावण्यासाठी आणि सचोटी व विश्वसर्ता कार्यक्षमता आणि उच्च दर्जा पुनरुवस्थापित करण्यासाठी शिक्षण शिक्षणाचे क्षेत्र आणि त्याची नियमाप्रमाणे या दोन्हींमध्ये तातडीने कृती करून मूलभूत बदल करण्याची गरज आहे.

**महाराष्ट्रातील दिव्यांगांचे उच्च शिक्षण सद्यस्थिती, समस्या व उपाय**

दिव्यांगांच्या प्राथमिक शिक्षणातील अनेक अडथळयांचा परिणाम म्हणून दिव्यांग विद्यार्थ्यांचे प्राथमिक शिक्षणातील गळतीचे प्रमाण लक्षणे आहेत जे विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊ इच्छितात अशा विद्यार्थ्यांना एकतर शंभर टक्के शासनाच्या शिष्यवृत्ती व योजनांवर अवलंबून राहावे लागते किंवा तुमच्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांची आर्थिक परिस्थिती सदन आहे अशा दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचा लाभ झाल्याचे दिसते परंतु हे प्रमाण अतिशय नगण्य आहे.

बहुतेक सर्व वर्गामध्ये विशिष्ट शैक्षणिक अक्षरता असलेली मुले असतात आणि त्यांना सातत्याने मदतीची गरज असते संशोधनाने हे स्पष्ट केले आहे की जितके लवकर अशी मदत केली जाईल तितकी प्रगतीची शक्यता जास्त असते शिक्षणातील अशा अक्षमता लवकर शोधण्यासाठी आणि त्यांच्या निराकारण्यासाठी विशेष योजना आखण्यासाठी शिक्षकांना मदत केली पाहिजे विशिष्ट कृतीमध्ये मुलांना आपल्या गतीने काम करण्याची परवानगी देण्यासाठी आणि त्यासाठी सक्षम करण्यासाठी योग्य तंत्रज्ञानाचा वापर प्रत्येक मुलांच्या चांगल्या गोष्टीतील जास्तीत जास्त वापर करण्यासाठी लवचिक अभ्यासक्रम आणि योग्य मूल्यांकन तसेच प्रमाणीकरणासाठी योग्य प्रणाली तयार करणे याचा समावेश आहे.

परंतु आपल्याकडे अद्यापही पारंपरिक शिक्षण पद्धतीतून बाहेर येऊन अक्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना शोधून त्यांना त्यांच्या गरजेनुसार अध्ययन अध्यापन करण्याची विशेष आणि वेगळी यंत्रणा अद्यापही कार्यान्वित झालेली नाही तसेच आवश्यक तिथे तंत्रज्ञानात तंत्रज्ञानाचा वापर दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उच्चशिक्षणासाठी केला जात नाही दिव्यांगांच्या उच्च शिक्षणासाठी फारशा वेगळया तरतुदी केल्याचे दिसून येत नाही.

दिव्यांग प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्यात एकही स्वतंत्र वस्तीग्रह नाही त्यामुळे दहावीनंतर अनेक विद्यार्थ्यांची शिक्षणात गळती होते त्यामुळे गुणवत्ता असून अनेक विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणापासून गळती होते त्यामुळे विद्यार्थी समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहतात व सामाजिक न्याय विभागाच्या दिव्यांग कल्याण आयुक्तालयाच्या वतीने प्रत्येक जिल्ह्यात जिल्ह्याच्या ठेकेरासाठी स्वतंत्र दिव्यांगांसाठी वस्तीग्रह उभारण्याची मागणी अनेक वर्षापासून होत आहे उच्च शिक्षण घेण्यासाठी जसे वेगवेगळया समाज घटकासाठी स्वतंत्र महाविद्यालय आहे उदाहरणार्थ महिला महाविद्यालय शेतकी महाविद्यालय अभियांत्रिकी महाविद्यालय रात्र महाविद्यालय ग्रामीण महाविद्यालय आहे तसेच दिव्यांग महाविद्यालय चे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार क्षमतेनुसार गरजेनुसार शिक्षण देऊ शकेल अशा प्रकारच्या स्वतंत्र दिव्यांग महाविद्यालयाची संकल्पना अद्यापही भारतात महाराष्ट्रात अस्तित्वात आलेली नाही त्याचा परिणाम म्हणून अनेक विद्यार्थी दिव्यांग विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहतात.

मूकबधिर विद्यार्थ्यांना तांत्रिक उच्च शिक्षण घेण्याच्या दृष्टीने आयटीआय कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय इत्यादी ठिकाणी विशेष शिक्षक नियुक्त करणे अत्यावश्यक असताना तशी सुविधा कोणत्याही संस्थेत करण्यात आलेली नाही.

**दिव्यांगांचे सर्वकष सबलीकरण**

दिव्यांगांचे सर्वंकष सबलीकरण म्हणजे सामाजिक आर्थिक शैक्षणिक दृष्ट्या कोणावरही अवलंबून न राहता स्वतःच्या पायावर उभे राहून स्वतःचे आयुष्य स्वतःच्या क्षमतेचा वापर करून जगणे म्हणजे सर्वंकष सबलीकरण म्हणता येईल. आर्थिक विकासासाठी परंतु स्वातंत्र्योत्तर काळातील विविध शासकीय धोरणे व योजनांचा फारसा लाभ दिव्यांग व्यक्तींना झालेला दिसून येत नाही त्यामुळे त्यांच्या सर्वांकष सबरीकरणांमध्ये अनेक अडथळे आल्याचे दिसते.

महाराष्ट्रातील दिव्यांगांच्या पुनर्वसनासाठी व त्यांना रोजगार उपलब्ध करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारने अपंग वित्त विकास महामंडळाची स्थापना केली आहे परंतु या महामंडळाला राज्य सरकारकडून पुरेसा निधी उपलब्ध करून दिला जात नाही त्यामुळे दिव्यांगांना स्वतःची रोजगार निर्माण करण्यामध्ये अनेक अडथळयांना सामोरे जावे लागते तसेच दिव्यांगांना रोजगार उपलब्ध करण्याच्या दृष्टीने टेलिफोन बूथ स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले होते पण अनेक महापालिकांनी महानगरातील रस्त्याच्या कडेला असलेले सगळे स्टॉल अतिक्रमण हटवताना काढून घेतले मोठ्या शहरांमध्ये प्रामुख्याने मुंबई पुणे नागपूर इत्यादी महानगरांकडे या दिव्यांगांची पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने कोणतीही योजना नाही दिव्यांगांना रोजगाराच्या हेतूने 26q² भूखंड मंजूर करण्याचा निर्णय होऊन अनेक वर्षे झाली परंतु या निर्णयाची कुठेही अंमलबजावणी होताना दिसून येत नाही दिव्यांग असलेली व्यक्ती व दिव्यांग नसलेली व्यक्ती यांच्या विवाह प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने 50 हजार रुपये अनुदान देण्याची सरकारची योजना आहे परंतु या योजनेचा निधी उपलब्ध करून दिला जात नाही दिव्यांगांच्या कोट्यातील नोकरी मिळविण्याच्या हेतूने अनेक वर्षापासून लोकांनी दिव्यांगांचे बोगस प्रमाणपत्र मिळवून नोकरी मिळवण्याचे प्रकार लक्षात आले आहे अपंग व्यक्ती समान संधी हक्क नियम 1955 मधील कलम 69 नुसार अशा लोकांवर कारवाई होणे अपेक्षित आहे परंतु अद्याप कोणावरही कारवाई झालेली दिसून येत नाही

महानगरामध्ये किंवा ग्रामीण भागामध्ये असणाऱ्या दिव्यांगांना दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायत महानगरपालिका नगरपंचायतीमध्ये दिव्यांगांची नोंदणी करणे आवश्यक असताना शंभर टक्के नोंदणी होत नाही त्यांना शासकीय योजनेतून घरकुल देणे रोजगार उपलब्ध करून देणे याशिवाय इतर शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे आवश्यक असताना कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्था याबाबत स्वतंत्र अभिलेखे ठेवीत नाही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण निधीतील तीन टक्के निधी अपंगांच्या आर्थिक विकासासाठी खर्च करणे आवश्यक आहे परंतु याकडे सुद्धा स्थानिक स्वराज्य संस्था दुर्लक्ष करतात.

स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या आर्थिक क्षमता आणि आर्थिक विकासाच्या मर्यादेत खाजगी क्षेत्रातील नियुक्ती त्यांना त्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या निदान 5% तरी लक्ष्मी अभंग व्यक्तींना नेमणुकात सामावण्याची हमी देणे गरजेचे आहे. उपलब्ध अपंग आरक्षणाची नोकऱ्यांमध्ये काटेकोरपणे अंमलबजावणी करावी व बिंदू नामावलीनुसार रोस्टर पूर्ण करावे सामाजिक विकासासाठी दिव्यांग अधिकार

अधिनियम 2016 मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की पंचायत राज सदस्य आमदार प्रशासक पोलीस प्रशासक न्यायाधीश आणि वकील यांच्या प्रशिक्षणाकरिता सर्व पाठ्यक्रमांमध्ये अपंगांच्या अधिकारावर प्रशिक्षण देणे बंधनकारक असताना त्याची अंमलबजावणी होताना दिसून येत नाही.

अपंगत्वाची मानवी परिस्थिती आणि अपंग व्यक्तीच्या हक्कांबद्दल शाळा महाविद्यालय विद्यापीठे आणि व्यावसायिक प्रशिक्षण स्तरावर मार्गदर्शन व संवेदना निर्माण करणे गरजेचे आहे परंतु नकारात्मक दृष्टिकोनामुळे अशा प्रकारची मार्गदर्शन शिबिरे आयोजित केली जात नाही.

उच्च शिक्षण देणारे शासकीय संस्था आणि इतर सरकारी मदत स्वीकारणारे उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांनी पाच टक्के पेक्षा कमी राखीव जागा लक्षणीय अपंग व्यक्तीसाठी राखून ठेवल्यास चालणार नाही लक्षणीय अपंग असलेल्या व्यक्तींसाठी उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थेत प्रवेशासाठी वयोमर्यादा पाच वर्षांनी शेती केली जावी

शिक्षणाचा अधिकार कायदा 2009 च्या 35 व्या नियमना सामावलेल्या लक्षणीय अपंगत्व असलेल्या 6 ते 18 वर्षा दरम्यानच्या प्रत्येक मुलाला अस्पताच्या शाळेत व त्याच्या निवडीच्या खास शाळेत विनामूल्य शिक्षणाचा अधिकार द्यावा व त्याची सुयोग्य अंमलबजावणी करावी.

स्थानिक स्वराज्य संस्थांनी आर्थिक क्षमता आणि विकासांतर्गत सर्व अपंग व्यक्तींसाठी विशेषतः आरोग्य शिक्षण आणि रोजगार या क्षेत्रातील पुनर्वसन सेवा आणि कार्यक्रम आयोजित करावेत जे दिव्यांगांच्या सर्वंकष विकासासाठी कारणीभूत ठरतील, अपंग व्यक्तींच्या हक्कांचा विद्यापीठ महाविद्यालय आणि शाळांच्या अभ्यासक्रमामध्ये समावेश होणे सुनिश्चित करणे गरजेचे आहे परंतु त्याकडेही जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते.

**समारोप**

ग्रामीण व शहरी भागातील दिव्यांग याबाबत कुठलाही भेदभाव न करता शासनाने व स्थानिक स्वराज्य संस्थांनी दिव्यांगांच्या शालेय शिक्षणासाठी प्रवर्गणी आहे क्षमता दिसतेस अभ्यासक्रम पाठ्यक्रम याची काटेकोरपणे अमोल भजनी करून स्वतंत्र शिक्षण व्यवस्थेची व्यवस्था करावी तसेच शासकीय पातळीवर दिव्यांग हा समाजातील एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेऊन विशिष्ट कृती कार्यक्रम राबवावा व दिव्यांगांच्या योजनांची धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्या सर्वच प्रकारच्या समाज घटकांनी आपला दिव्यांग विषयीचा दृष्टिकोन सकारात्मक ठेवल्यास दिव्यांगांच्या प्राथमिक माध्यमिक व उच्च शिक्षणातील अडथळे दूर होण्यास वेळ लागणार नाही त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षणातील गळतीचे प्रमाण थांबून मोठ्या प्रमाणात दिव्यांग विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी प्रवर्त होतील व हे त्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी योग्य असेल.

सर्वच प्रकारच्या राज्य शासनाने दिव्यांगांसाठी स्वतंत्र महाविद्यालय व निवासासाठी स्वतंत्र वस्तीग्रह सुरू करावेत तसेच दिव्यांगांच्या सामाजिक समावेशासाठी समाजातील सर्वच समाज घटकांनी आपला दिव्यांग विषय असलेला दृष्टिकोन सकारात्मक ठेवून दिव्यांगांच्या सर्वांकष सबदीकरणासाठी प्रयत्न करावे.

**संदर्भ ग्रंथ**

1. Disablity Inclusion and Inclusive Education - Ramav Sabapathi vinayagan, CRC Press- Sept 30, 2022
2. Integrated evaluation of Disability - Sailaja cheating, Dept. of Education, University of Delhi, Springler Publications Singapore
3. विकलांगता का समाजशास्त्रीय अध्ययन- डॉ. संगीता परमानंद- Publishers, lata sahitya Sadan, Chazibad, 2017
4. Person with Disabilities ((Divyangjan) in India- A Stastical Profile: 2021, Govt.of India
5. Disability rights and law in india - Adroit Publishers (1Feb 2017)
6. Gender and Disability in Education Barriers and opportunities- Edi.- Dazy zarabi & kuldip kaur
7. Disability Studies in India: Retrospects an Prospects - G. N. Karna, Publishers, Gyan Publishing house-2001
8. दिव्यांग अधिकार कायदा - 2016
9. नवीन शैक्षणिक धोरण - 2020
10. दैनिक- सकाळ, लोकमत, लोकसत्ता, पुढारी, इंडियन एक्सप्रेस